**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **घोडबंदर गावालगत असलेले सगनाई देवी मंदिराचे यशस्वी व शांततापूर्ण स्थलांतर**
- **वाहतूक कोंडी समस्येवर तोडगा काढत नागरिकांच्या सहकार्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेची महत्त्वपूर्ण कारवाई**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 04 अंतर्गत दिनांक 22 एप्रिल 2025 रोजी घोडबंदर गाव येथील सगनाई देवीचे मंदिर हे नागरिकांच्या सहकार्याने व विधिपूर्वक नवीन जागी स्थलांतरित करण्यात आले. वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदर गाव परिसरात वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) मार्फत रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाच्या अनुषंगाने मंदिराच्या स्थलांतराची आवश्यकता निर्माण झाली होती.

मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व नॅशनल हायवे ऑथॉरिटी च्या पत्रव्यवहारानंतर, महापालिकेच्या विविध विभागांनी समन्वयाने ही कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली. या कारवाईस अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अतिक्रमण) कल्पिता पिंपळे, पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, पोलीस वरिष्ठ निरीक्षक, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण विभागप्रमुख, पोलिस पथक, कर्मचारी, फेरीवाला पथक आणि महाराष्ट्र सुरक्षा बल जवान यांनी आपली उपस्थिती व जबाबदारी निभावली. या संपूर्ण प्रक्रियेत घोडबंदर गावातील ग्रामस्थ तथा मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर चंद्रकांत वैती, पदाधिकारी केशव घरत, शांताराम ठाकूर, रणजीत किणी यांच्या नेतृत्वाखाली, स्थानिक नागरिक आणि मंदिर व्यवस्थापन समिती यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका आणि पोलिस प्रशासनास शांततापूर्ण सहकार्य करून एक अनुकरणीय उदाहरण सादर केले आहे. धार्मिक श्रद्धा, कायद्याचे पालन आणि सार्वजनिक हित यामधील समतोल राखत, या स्थलांतराने नागरी भागातील विकासासाठी एक नवा आदर्श निर्माण केला आहे.